माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ९१/२०२१**

**अपिलार्थी, श्री. जितेंद्र मारोती चिवंडे,**
घर नं.१९८, आनंद नगर, सिताबर्डी, नागपूर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अधिक्षक,**
धंतोली झोन क्र.४, महानगर पालिका, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
धंतोली झोन क्र.४, महानगर पालिका, नागपूर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०९.२०२२**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०७.२०२० | २८.०७.२०२० | ०४.०९.२०२० | २६.१०.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा** सहायक अधिक्षक, धंतोली झोन क्र.४, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे दिनांक २०.०७.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दि. २२.०९.२०११ व दि. ७.०३.२०१२ या अर्जावर झालेल्या कार्यवाहिची माहिती मिळणेबाबत मौजा सिताबर्डी, आनंदनगर एरीया येथील कार्पो घर नं.१९८ या घटावरील कार्पोरेशन टॅक्स पावतीवरून वारसानांचे नावे यावर झालेल्या कार्यवाहिची लिखीत स्वरूपात माहिती देण्यात यावी." याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक. २८.०७.२०२० ला उपरोक्त अपिलार्थी यांचे वार्ड क्र.०२ घर क्र.१९८ या नस्तीच्या दस्ताऐवजींची मागणी केलेली आहे. मागणी केलेल्या वार्ड क्र.३ घर क्र.१९८ ची नस्ती कार्यालयात उपलब्ध असून उक्त नस्तीचे निरीक्षण क्षेत्रीय कार्यालय, धंतोली झोन क्र.४, दि. ३०.०७.२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता करुन आवश्यक कागदपत्रांची मागणी केल्यास सबंधीत दस्ताऐवज माहितीच्या स्वरुपात पुरविता येईल. असे कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०९.२०२० रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी **तथा** सहायक आयुक्त, धंतोली झोन क्र.४, महानगर पालिका, नागपूर यांचेकडे "अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत." असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५.१०.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून, दि. २६.१०.२०२० रोजीच्या आदेशात अपीलार्थी व जन माहिती अधीकारी यांचे निवेदन लक्षात घेवुन अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीचा स्पष्ट उल्लेख होत नसुन मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून कार्यालयात सदर माहिती अभिलेख स्वरूपात उपलब्ध नाही करीता माहितीच्या अधिकार अधिनियम कलम २ (च) अन्वये माहिती पुरविणे शकत नाही असे आदेशित करून प्रकरण खारिज करण्यात येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक ०८.०१.२०२१ रोजी " माहिती मिळणेबाबत." असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १३.०९.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री. जितेंद्र चिवंडे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहायक अधिक्षक श्री. जे. डी. हिरणवार उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त श्री. किरण श्रावण बगडे, सहायक आयुक्त धंतोली झोन नागपूर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दि. २२.०९.२०११ व दि. ७.०३.२०१२ या अर्जावर झालेल्या कार्यवाहिची माहिती मिळणेबाबत मौजा सिताबर्डी, आनंदनगर एरीया येथील कार्पो घर नं.१९८ या घटावरील कार्पोरेशन टॅक्स पावतीवरून वारसानांचे नावे यावर झालेल्या कार्यवाहिची माहिती मागितली आहे.

त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक. २८.०७.२०२० ला अपिलार्थी यांचे वार्ड क्र.०२ घर क्र.१९८ या नस्तीच्या दस्ताऐवजींची मागणी केलेली आहे. मागणी केलेल्या वार्ड क्र.३ घर क्र.१९८ ची नस्ती कार्यालयात उपलब्ध असून उक्त नस्तीचे निरीक्षण क्षेत्रीय कार्यालय, धंतोली झोन क्र.४, दि. ३०.०७.२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता करुन आवश्यक कागदपत्रांची मागणी केल्यास सबंधीत दस्ताऐवज माहितीच्या स्वरुपात पुरविता येईल, असे कळविले. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.१०.२०२० रोजी सुनावणी घेवून आदेश पारित केले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २ (च) नुसार उपलब्ध माहिती आधीच पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी केलेली कार्यवाहीबाबत आक्षेप नोंदविला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम कलम २ (च) अन्वये माहिती पुरवू शकत नाही असे आदेशित करून प्रकरण खारिज केले. ही बाब लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (च) नुसार केलेली कार्यवाही योग्य नाही.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग सत्यमेव जयते नागपूर

A/s-2021/91-2021/chivade

अपिलार्थी यांना नस्तीचे अवलोकन देण्यात आले व उपलब्ध असलेली प्रत याआधीच प्रदान करुन अपिल अर्ज निकाली काढले. मात्र अपिल अर्ज निकाली काढत असतांनाच मालमत्ता करारावर त्यांची नावे वगळून जी नावे पाठविण्यात आली नेमक्या कुठल्या दस्ताऐवजाच्या आधारे पाठविण्यात आली. याबाबतीत संबंधित सादर करण्यात आलेले कागदपत्र व संपूर्ण दस्ताऐवज माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २ (च) नुसार सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत अपिलार्थीस विनामूल्य प्रदान करण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य
नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.०९.२०२२**

12 8 NOV 2022

जावक क्रमांक 6064 ------ दिनांक ------------------------

A/s-2021/91-2021/chivade